**विद्यमान न्यायाधीश, सहकारी न्यायालय, अमरावती यांची न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी श्रीमती. करुणा अ. पट्टेबहादुर)

दावा क्र. ८५ /२०२२ नांदगाव

वि. महाराष्ट्र

निशाणी क्र. २५

**वादीचा साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.१ चे विधिज्ञ श्री. ए. जे. कडु मार्फत शपथेवर सुरु :**

तुर खरेदी करीता आमची नेमणुक जेव्हा सब एजंट म्हणून होते तेव्हा आम्हाला ते पत्राव्दारे कळविल्या जाते. त्या आधी आम्हाला कुठलीही माहिती नसते. २०१७-१८ च्या सब एजंट नेमणुकीबाबतची माहिती संस्थेला दि.०१/०२/२०१८ रोजी पत्रा व्दारे कळली. ते पत्र.नि.७१ वर दाखविले आहे. सब एजंट च्या नेमणुकीबाबत पत्र मिळाल्यानंतर संस्था त्या बाबतचा ठराव पास करते. त्यानंतर जो करार होतो त्यावर स्टॅम्प घेतल्या जातो. नि.क्र. ७१ प्रमाणे करारनामा हा ५००/- रुपयाच्या स्टॅम्प वर करुन दयावा लागतो. हे म्हणणे खेर नाही की, खरेदीचे स्पेसिफीकेशन व करार नामा आमच्या कडे नाही या बाबत मी खोटे सांगत आहे. मला आता नि.क्र.५४ दाखविण्यात आला ते मीच दाखल केला आहे. २०१६-१७ दरम्यान खरेदी बाबत माहित नाही. २०१६-१७ च्या खरेदी बाबत काय खरेदी झाली कशी खरेदी झाली याबाबत मला माहिती आहे. २०१६-१७ च्या दरम्यान जी खेरदी झाली त्याच्या वेअर हाऊस च्या पावत्याची पोच संस्थेने प्रतिवादी कडुन घेतलेली आहे. जितकी तुर आम्ही वेअर हाऊस ला जमा केली त्याचे पैसे नाफेड हे प्रतिवादींना देतो व तितकेच पैसे आम्हाला भेटायला पाहिजे. जी तुर आम्ही जमा करतो त्याची माहिती रेकोर्ड वादी संस्थेकडे असते. तो रेकॉर्ड हा परमनंट रेकॉर्ड असतो. किती तुर खरेदी केली व किती तुर वेअर हाऊस ला ठेवली याची माहिती मार्केटींग फेडरेशन ला दयावी लागते ती माहिती लेखी स्वरुपात देण्यात येते. पुर्ण खरेदी झाल्यानंतर त्याची माहिती मार्केटींग फेडरेशन ला दयावी लागते. पुर्ण माहिती न दिल्यास हिशोब पुर्ण होत नाही.

मध्यंतराची वेळ झाल्याने उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

दि. ३०/०६/२०२६ (श्रीमती. करुणा अ. पट्टेबहादुर)

न्यायाधीश,

सहकारी न्यायालय, अमरावती